# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** नागपूर महानगरपालिका, क्षेत्राअंतर्गत झिरो माईल ही पुरातत्व
**{प्रकल्प विभाग 3}** वास्तु पर्यटन स्थळ म्हणुन विकसीत करण्याचे कामासाठी प्रकल्प व्यवस्थापकिय सल्लागार यांच्या नियुक्त करण्याकरीता मा. आयुक्त महोदयांनी दि. 24/06/2025 रोजी मंजुरी प्रदान केली आहे.

सदर काम विशिष्ट स्वरुपाचे असल्याने प्रकल्प व्यवस्थापकिय सल्लागार यांना प्रकल्पाचे मुळ रक्कमेच्या 3% दराने देण्यास मा. आयुक्त महोदय यांनी मान्यता प्रदान केली आहे. सदर कामाची EOI मागविण्यात आले असता एकुण दोन प्रकल्प व्यवस्थापकिय सल्लागार यांनी सहभाग घेतला असून दोन्ही प्रकल्प व्यवस्थापकिय सल्लागार हे पात्र झाले. दोन्ही सल्लागारा पैकी M/s Mahimyra Creation Pvt. Ltd Nagpur यांची 2.95% दराची निम्नत्तम EOI प्राप्त झाली असुन यास मा. आयुक्त महोदयांनी दि. 01/08/2025 रोजी मान्यता प्रदान केली आहे.

करीता M/s Mahimyra Creation Pvt. Ltd Nagpur यांना 2.95% प्रकल्पाचे मुळ राशीच्या (Excluding GST) दराने कार्यादेश प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

**टिप:-** १) प्रस्तृत कामास इंडीयन ऑईल कॉर्पोरेशन ली. तर्फे कॉर्पोरेट सोशल रिस्पोंसिबीलीटी (CSR) अंतर्गत निधी उपलब्ध आहे.
२) सदर कामाच्या प्रकल्प व्यवस्थापकिय सल्लागार नियुक्तीला मा.आयुक्त यांची मान्यता प्राप्त आहे.
3) विस्तृत टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :-** 246/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक** :- 22/08/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता (प्रकल्प-3), प्रकल्प विभाग, यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिका, क्षेत्राअंतर्गत झिरो माईल ही पुरातत्व वास्तु पर्यटन स्थळ म्हणुन विकसीत करण्याचे कामासाठी प्रकल्प व्यवस्थापकिय सल्लागार यांच्या नियुक्त करण्याकरीता मा. आयुक्त महोदयांनी दि. 24/06/2025 रोजी मंजुरी प्रदान केली आहे.

सदर काम विशिष्ट स्वरुपाचे असल्याने प्रकल्प व्यवस्थापकिय सल्लागार यांना प्रकल्पाचे मुळ रक्कमेच्या 3% दराने देण्यास मा. आयुक्त महोदय यांनी मान्यता प्रदान केली आहे. सदर कामाची EOI मागविण्यात आले असता एकुण दोन प्रकल्प व्यवस्थापकिय सल्लागार यांनी सहभाग घेतला असून दोन्ही प्रकल्प व्यवस्थापकिय सल्लागार हे पात्र झाले. दोन्ही सल्लागारा पैकी M/s Mahimyra Creation Pvt. Ltd Nagpur यांची 2.95% दराची निम्नत्तम EOI प्राप्त झाली असुन यास मा. आयुक्त महोदयांनी दि. 01/08/2025 रोजी मान्यता प्रदान केली आहे.

करीता M/s Mahimyra Creation Pvt. Ltd Nagpur यांना 2.95% प्रकल्पाचे मुळ राशीच्या (Excluding GST) दराने कार्यादेश प्रदान करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.